# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स – २२६९२१०२

तार-EDUTECH E-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in internet:- http://www.dte.org.in


क्रमांक :-१५/अर्थसं/कं.सेवा /२०१४-१५/१०३

दिनांक :- २९/१२/१४

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

विषय :- बाहय यंत्रणेद्वारे सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे व मानधनाबाबत...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्थेमध्ये सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यापूर्वी संबंधित विभागीय कार्यालयांची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक असुन यापूर्वीच या कार्यालयांने सर्व विभागीय कार्यालयांना सूचित केले आहे. तरी सुध्दा काही संस्था प्रमुख संबंधित विभागीय कार्यालय व या कार्यालयाचे पूर्व परवानगी न घेता संस्थास्तरावर नियुक्ती करतात व नियुक्ती करते वेळी कोणत्या अटी व नियमांचे अधिन राहून नियुक्ती केली आहे. तसेच बाहय यंत्रणेद्वारे नियुक्ती देणेबाबत कंत्राटदाराकडून करारपत्र, प्रतिज्ञापत्रे इत्यादी घेतले जाते किंवा कसे याबाबत बोध होत नाही. परिणामस्वरुप त्यांच्या मानधनाचा प्रश्न निर्माण होतो. काही कंत्राटदार सुरक्षा रक्षकांच्या लेव्ही, विमा, धुलाई भत्ता, महागाई भत्ता, इत्यादी अतिरीक्त भत्त्यांची रकमेपोटी मागणी करतात व संस्था पत्रे थेट या कार्यालयास सादर करतात. संस्था स्तरावर परस्पर सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केल्यामुळे उपरोक्त नमूद भत्यांच्या संदर्भात न्यायालयीन प्रकरणे न्याय प्रविष्ट झाली आहेत.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील कोणकोणत्या संस्थेच्या सुरक्षा रक्षकांच्या नियुक्तीस मान्यता दिलेल्या आहेत, व कोणत्या संस्थांना मान्यता नाहीत अशा सर्वांचा आढावा घेऊन अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती. आवक क्र. २९० दिनांक ९३/१/१५

आस्था ... १७ ...

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

पृ.क्र.विकाअ/आस्था/कं.सेवा/२०१५/ ९१६
दिनांक :- १८/०१/२०१५

प्रति,

प्राचार्य,शा. अभि.महा.,अमरावती/शा.औषधनिर्माण शास्त्र महा.अमरावती
प्राचार्य,शासकीय तंत्र निकेतन,अमरावती/खामगांव/यवतमाळ/वाशीम/मुर्तीजापूर/
प्राचार्य,शासकीय निवासी महिला तंत्र निकेतन,यवतमाळ यांनी आपल्या संस्थेत पुर्व परवांनगी न घेता परस्पर सुरक्षा रक्षकाची नेमणुक केली आहे किंवा कसे याबाबत माहिती तात्काळ सादर करावी.

प्रत :- प्रोग्रामर,वि.का.,अमरवती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण वि.का.,अमरावती